

# मायक्रोफायनान्स पल्स रिपोर्ट

अंक 14 - नोव्हेंबर 2022

# वैश्लेषिक संपर्क


## इक्विफॅक्स

किरण समुद्रला
मुख्य - डेटा वैश्लेषिक
kiran.samudrala@equifax.com

श्रुती जोशी
मुख्य - अवगाहन व वैश्लेषिक
shruti.joshi@equifax.com

वंदना पांचाळ
सहयोगी व्यवस्थापक - अवगाहन व वैश्लेषिक
vandana.panchal@equifax.com

## सिडबी

संजय जैन
मुमप्र - इआरडीएवी
erdav@sidbi.in

गिंस्वान्मूंग हँगझो
समुप्र - इआरडीएवी
erdav@sidbi.in

वंदिता श्रीवात्सव
सप्र - इआरडीएवी
erdav@sidbi.in

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कार्यकारी सारांश | 04 |
| संक्षेप आणि शब्दावली | 05 |
| सूक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन | 06 |
| वितरणाचे कल | 09 |
| उद्योग जोखमीची रूपरेखा | 12 |
| महत्वाकांक्षी जिल्हे | 14 |
| ग्राहकस्तराच विश्लेषण | 16 |
| पतमागणीच विश्लेषण | 18 |

# कार्यकारी सारांश

एमएफआय पल्सची ही 14 वी आवृत्ती 30 जून 2022 पर्यंतच्या कालावधीसाठी ब्युरोकडील प्राप्त डेटा संकलनावर आधारित आहे.

सूक्ष्मवित्त उद्योगाची पोर्टफोलिओ शिल्लकबाकी 30 जून 2022 पर्यंत रु. 266,541 करोड असून 1,041 लक्ष सक्रिय कर्जे आणि 5 करोड अनन्य सक्रिय ग्राहक आहेत. पोर्टफोलिओ शिल्लकबाकीमध्ये बँकांचे योगदान सर्वाधिक आहे. एमेजू '22 तिमाहीमधे बँका, एनबीएफसी-एमएफआय आणि लघुवित्त बँका यांचे पोर्टफोलिओ शिल्लकबाकीतील योगदान 90% तर वितरीत रकमेमधे 89% आहे. जून 2021 च्या तुलनेत जून 2022 पर्यंत सूक्ष्मवित्त उद्योगात 20% वाढ झाली आणि मार्च 2022 ते जून 2022 पर्यंत तिमाही-गत-तिमाही दरात 1% ची वाढ झाली. जून 2021 च्या तुलनेत जून 2022 पर्यंत एनबीएफसीमध्ये सर्वाधिक 56% ची वर्षगतवर्ष वाढ झाली.

मूल्यानुसार वितरणामध्ये वार्षिक 116% वाढ दिसून आली तर एमेजू '21 ते एमेजू '22 मधे आकारमानानुसार वितरणात 92% वाढ झाली आहे. एमेजू '21 ते एमेजू '22 काळात एनबीएफसीमधे वितरण रकमेच्या बाबतीत सर्वाधिक 265% तर संख्येनुसार 225% वाढ झाली. एमेजू '21 च्या तुलनेत एमेजू '22 मधे सर्वाधिक कर्जे 30k-40k तिकिट आकार श्रेणी अंतर्गत जारी केली आणि यात 153% ची वार्षिक वाढ दिसून आली

जून 2022 मध्ये जून 2021 च्या तुलनेत सर्व कसूर श्रेणीत घट झाली आहे. मार्च 2022च्या तुलनेत जून 2022 मध्ये 60-89 डीपीडी वगळता इतर सर्व कसूर श्रेणीमध्ये घट झाली आहे.

महत्वाकांक्षी जिल्ह्यांची 30 जून 2022 पर्यंत पोर्टफोलिओ शिल्लकबाकी रु. 37,124 करोड असून ती जून 2021 ते जून 2022 पर्यंत 29% नी वाढली. महत्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये जुलै 2021 ते जून 2022 या काळात ₹ 41,025 करोड मूल्याची कर्जे वितरीत करण्यात आली.

25k-50k शिल्लकबाकी श्रेणीत एनबीएफसी कडे सर्वाधिक कर्जदार असून त्यानंतर लघुवित्त बँकेकडे आहेत. ना-नफा एमएफआय वगळता, 50% पेक्षा जास्त कर्जदार >=25k शिल्लकबाकी श्रेणीतील आहेत.

या आवृत्तीत आम्ही अनुक्रमित एमएफआय पतमागणी आकारमान विश्लेषण सादर केले आहे. कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेनंतर सूक्ष्मवित्त उद्योगाने नवीन कर्ज उत्पत्तीत सुधारणा दर्शविली आहे. मार्च'21 ते जून'22 दरम्यान, सप्टेंबर 2021 मध्ये सर्वाधिक पतमागणी झाली तसेच जून 2021 च्या तुलनेत जून 2022 मध्ये अधिक पतमागणी झाली.

# संक्षेप आणि शब्दावली

- ATS एटिएस (सरासरी तिकीट आकार) = वितरीत कर्ज रक्कम / कर्जाची संख्या
- DPD डीपीडी = परतावा दिनांक उलटल्यानंतरचे दिवस
- सद्यकालीन शिल्लकबाकी पोर्टफोलियो किंवा उधारकर्ता किंवा सक्रिय कर्ज = 0 ते 179 डीपिडी + नवी खाती + वर्तमान खाती
- MFI एमएफआय = मायक्रोफायनॅन्स संस्था
- POS पीओएस = शिल्लकबाकी पोर्टफोलियो
- UT यूटी = केंद्रशासित प्रदेश
- AD महत्वाकांक्षी जिल्हे (एडी) - आरोग्य व आहार, शिक्षण, कृषी आणि जलस्त्रोत, वित्तीय समावेश, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांसारख्या संयुक्त निर्देशकांच्या दृष्टीने मानव विकासांक वृद्धीच्या सुधारणेसाठी जानेवारी 2018 मध्ये नीती आयोग, भारत सरकारने निश्चित केलेले जिल्हे (सध्या संख्येने 117).

- 1-179 = 1 to 179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 1-29 = 1 to 29 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 30-59 = 30 to 59 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 60-89 = 60 to 89 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 90-179 = 90 to 179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 30+ कसूर = 30-179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 90+ कसूर = 90-179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस


- एमेजू ‘21 = एप्रिल 2021 ते जून 2021
- जुऑस ‘21 = जुलै 2021 ते सप्टेंबर 2021
- ओएनडि ’21 =ऑक्टोबर 2021 ते डिसेंबर 2021
- जाफेमा ’22 = जानेवारी 2022 ते मार्च 2022
- एमेजू ’22 = एप्रिल 2022 ते जून 2022



# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन

# सूक्ष्मवित्त उद्योगाचे आशुचित्र
## यथा 30 जून 2022

| आशुचित्र यथा 30 जून 2022 | बँका | लविबँक | एनबीएफसी-एमएफआय | एनबीएफसी | ना-नफा-एमएफआय | एकूण उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|
| अनन्य सक्रिय ग्राहक ('000) | 25,548 | 12,099 | 23,286 | 7,524 | 964 | 69,421 |
| सक्रिय कर्जे ('000) | 38,975 | 16,161 | 39,139 | 8,576 | 1,279 | 104,130 |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड ) | 98,445 | 44,810 | 95,671 | 25,232 | 2,383 | 266,541 |
| वितरीत रक्कम (₹ करोड ) एमेजू '22 | 20,868 | 9,458 | 21,640 | 5,901 | 266 | 58,133 |
| सरासरी तिकीट आकारमान (₹) – एमेजू '22 | 37,743 | 45,118 | 38,756 | 44,482 | 44,380 | 39,830 |
| 30+ कसूर दर (POS) | 7.36% | 5.29% | 3.24% | 2.02% | 2.96% | 4.99% |
| 90+ कसूर दर (POS) | 2.32% | 1.99% | 1.58% | 0.79% | 1.12% | 1.85% |




- सूक्ष्मवित्त उद्योगाची 30 जून 2022 पोर्टफोलियो शिल्लकबाकी ₹ 266,541 करोड आहे
- पोर्टफोलियो शिल्लकबाकीतील बँकांच 37% योगदान सर्वोच्च आहे.
- एमेजू '22 तिमाहीमधे बँका, एनबीएफसी-एमएफआय आणि लघुवित्त बँका यांच पोर्टफोलियो शिल्लकबाकीत 90% योगदान असून वितरणातील योगदान 89%.
- लघुवित्तबँका, एनबीएफसी व ना-नफा-एमएफआय यांचे सरासरीतिकीटआकारमान सूक्ष्मवित्तउद्योगाच्या एटीएस पेक्षा जास्त.
- एनबीएफसी-एमएफआय, एनबीएफसी आणि ना-नफा एमएफआय चे 30+ आणि 90+ कसूरदर उद्योगाच्या एकूण कसूर दाराच्या तुलनेत कमी.


Note : In MFI segment there are ~5 crore unique live borrowers. Difference in the unique number of customers is due to the customers having multiple relationships with SFBs, Banks, NBFC-MFIs, NBFCs and Not for ProfIt MFIs

# सूक्ष्मवित्त उद्योगाचेअवलोकन

**पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड)**

| कर्जदाता प्रकार | Jun' 21 | Sep' 21 | Dec' 21 | Mar' 22 | Jun' 22 | Y-o-Y growth% |
|---|---|---|---|---|---|---|
| बँका | 95,674 | 92,725 | 93,841 | 102,032 | 98,445 | 3% |
| लघुवित्त बँका | 35,345 | 36,863 | 39,675 | 44,134 | 44,810 | 27% |
| एनबीएफसी-एमएफआय | 72,856 | 79,932 | 84,065 | 94,481 | 95,671 | 31% |
| एनबीएफसी | 16,140 | 14,621 | 16,337 | 19,155 | 25,232 | 56% |
| ना-नफा एमएफआय | 2,045 | 1,982 | 2,260 | 2,800 | 2,383 | 17% |
| एकूण उद्योग | 222,060 | 226,123 | 236,178 | 262,602 | 266,541 | 20% |
| तिमाही-दर-तिमाही वाढ | | 2% | 4% | 11% | 1% | |

**कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशचा कल**




- सूक्ष्मवित्त उद्योगात जून 2021 ते जून 2022 या काळात 20% वाढ झाली तर मार्च 2022 ते जून 2022 काळात 1% तिमाही-दर-तिमाही दराने वाढ झाली.
- एनबीएफसी मधे जून 2021 ते जून 2022 काळात सर्वोच्च 56% वर्षगतवर्ष तुलनात्मक वाढ झाली.




# वितरणाचे कल

# वितरणाचे कल - संस्था निहाय

वितरीत कर्ज संख्या (लक्ष)

| कर्जदाता प्रकार | AMJ' 21 | JAS'21 | OND' 21 | JFM' 22 | AMJ' 22 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 42 | 79 | 70 | 94 | 55 |
| लघुवित्त बँका | 10 | 36 | 29 | 30 | 21 |
| एनबीएफसी-एमएफआय | 19 | 69 | 65 | 79 | 56 |
| एनबीएफसी | 4 | 9 | 13 | 17 | 13 |
| ना-नफा एमएफआय | 1 | 2 | 3 | 4 | 1 |
| एकूण उद्योग | 76 | 195 | 180 | 224 | 146 |

**कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशचा कल**




- सूक्ष्मवित्त उद्योग कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेतून सावरत असून एमेजू '21 ते एमेजू '22 काळात वितरणात वार्षिक 116% तर संख्ये नुसार 92% वाढ झाली.
- कर्जवितरण संख्या आणि रक्कम यामध्ये एमेजू '21 ते एमेजू '22 काळात सर्वात जास्त वाढ एनबीएफसी ने नोंदवली.

**Disclaimer :** Sourcing data of all the previous quarters have been updated based on the updates received from the members.

# उद्योग तिकीट आकार - कल

वितरीत कर्ज संख्या (लक्ष)

| तिकीट आकार | AMJ' 21 | JAS' 21 | OND' 21 | JFM' 22 | AMJ' 22 | Y-o-Y growth rate % |
|---|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 10 | 18 | 10 | 11 | 6 | -40% |
| 10K-20K | 7 | 20 | 13 | 16 | 9 | 29% |
| 20K-30K | 13 | 34 | 25 | 30 | 17 | 31% |
| 30K-40K | 17 | 48 | 51 | 64 | 43 | 153% |
| 40K-50K | 11 | 30 | 31 | 39 | 28 | 155% |
| 50K-60K | 9 | 25 | 24 | 30 | 21 | 133% |
| 60K Plus | 9 | 20 | 26 | 34 | 22 | 144% |
| एकूण | 76 | 195 | 180 | 224 | 146 | 92% |
| तिमाही-दर-तिमाही कर्ज वितरणातील वाढ % | - | 157% | -8% | 24% | -35% | - |
| संपूर्ण भारताचा एटीएस (₹) | 35,438 | 35,299 | 39,194 | 40,080 | 39,830 | 12% |
| तिमाही-दर-तिमाही एटीएस वाढ दर % | - | -0.4% | 11% | 2% | -1% | - |

**वितरीत कर्ज संख्या**




- एमेज़ '21च्या तुलनेत एमेज़ '22 मधे सर्वाधिक कर्जे 30k-40k तिकिटआकार श्रेणीत असून यात 153% ची वार्षिक वाढ दिसून आली
- एमेज़ '21 च्या तुलनेत एमेज़ '22 मधे सरासरी तिकीट आकारमानात 12% वाढ झाली.

**Disclaimer :** Sourcing data of all the previous quarters have been updated based on the updates received from the members.





# उद्योग जोखमीची रूपरेखा

# कसूर दराचा कल

1-179 days past due

| Reporting Quarter | 1-29 days past due | 30-59 days past due | 60-89 days past due | 90-179 days past due | 1-179 days past due |
|---|---|---|---|---|---|
| Jun' 21 | 14.90% | 10.14% | 3.38% | 3.01% | 31.43% |
| Sep' 21 | 8.64% | 5.44% | 1.74% | 2.95% | 18.77% |
| Dec' 21 | 5.03% | 3.19% | 2.14% | 3.44% | 13.80% |
| Mar' 22 | 2.93% | 1.71% | 1.12% | 2.43% | 8.19% |
| Jun' 22 | 2.69% | 1.44% | 1.71% | 1.85% | 7.69% |

परतावादिनांक उलटल्यानंतरच्या दिवसात कसूर




- जून 2022 मध्ये जून 2021 च्या तुलनेत सर्व कसूर श्रेणीत घट झाली आहे
- जून 2022 मध्ये 60-89 डीपीडी वगळता इतर सर्व कसूर श्रेणीमध्ये मार्च 2022च्या तुलनेत घट झाली.



# महत्वाकांक्षी जिल्हे


# महत्वाकांक्षी जिल्हे - जून 2022 दृष्टीक्षेप

| महत्वाकांक्षी जिल्हे वाढीचा तपशील | 30th June 2021 | 30th June 2022 | Growth % |
|---|---|---|---|
| सक्रिय कर्जदार उत्पत्ती ('000) | 8,143 | 9,867 | 21% |
| वितरीत रक्कम (₹ करोड) | 30,353* | 41,025** | 35% |
| सक्रिय कर्ज ('000) | 12,730 | 15,031 | 18% |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड) | 28,737 | 37,124 | 29% |
| 30+ कसूर दर | 11.80% | 3.98% | - |
| 90+ कसूर दर | 2.36% | 1.48% | - |


- महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील पोर्टफोलिओ शिल्लकबाकी 30 जून 2022 रोजी ₹ 37,124 करोड असून जून 2021 पासून जून 2022 पर्यंत ती 29% वाढली.
- जून 2021 ते जून 2022 पर्यंत महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील सक्रिय कर्जदारांमधे 21% नी वाढ झाली.
- जुलै 2021 ते जून 2022 पर्यंत महत्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये ₹ 41,025 करोड कर्जवितरण झाले.
- बँका व लघुवित्त बँकाचे 30+ आणि 90+ कसूर दर महत्वाकांक्षी जिल्ह्यांच्या एकूण 30+ आणि 90+ कसूर दरापेक्षा जास्त.

**पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹.करोड) जून 30, 22**

**वितरीत रक्कम (₹ करोड) - जुलै'21 ते जून '22**




**कर्जदाता प्रकारानुसार 30+ आणि 90+ कसूर पोर्टफोलियो शिल्लकबाकी**







**Note:** *Disbursement July 2020 to June 2021 | **Disbursement July 2021 to June 2022 | Delinquencies are calculated basis POS



# ग्राहकस्तरांच विश्लेषण

# पोर्टफोलियो शिल्लकबाकीनुसार सक्रिय कर्जदार यथा 30 जून 2022





- 25K ते 50K शिल्लकबाकी असणारे सर्वात जास्त ग्राहक एनबीएफसी व त्यानंतर लघुवित्त बँका यांचे आहेत.
- ना-नफा एमएफआय शिवाय सर्वांचे 50% पेक्षा जास्त कर्जदार >= 25K शिल्लकबाकी श्रेणीत आहेत.

# पतमागणीच विश्लेषण



# अनुक्रमित सूक्ष्मवित्त पतमागणी आकारमान




- कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेनंतर सूक्ष्मवित्त उद्योगाने पतमागणीत सुधारणा दर्शविली.
- मार्च 2021 ते जून 2022 या कालावधीत सप्टेंबर 2021 या महिन्यात सर्वाधिक कर्जउत्पत्ती झाली.
- जून 2021 च्या तुलनेत जून 2022 मध्ये अधिक पतमागणी करण्यात आली

# सिडबी विषयी

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची (सिडबी) स्थापना 1990 साली संसदेच्या अधिनियमनामान्वये झाली. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या (एमएसइ) प्रोत्साहन, वित्तपुरवठा आणि विकासाची तिहेरी कार्यावली अमलात आणण्यासाठी आणि तत्सम कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी सिडबीला प्रमुख वित्तीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी अधिकृत केलेले आहे. इतक्या वर्षांमध्ये तिच्या विविध वित्तीय आणि विकासाच्या उपायांद्वारे बँकेने समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या जीवनात स्थान मिळविले आहे. तिने एमएसएमइ च्या समग्र वर्णपटातील उपक्रमांवर प्रभाव टाकला आहे आणि एमएसएमइच्या परिसंस्थेतील अनेक विश्वासार्ह संस्थांशी सलग्न झाली आहे.

व्हिजन 2.0 अंतर्गत सिडबीने एमएसएमइ विभागाच्या माहीतीची विषमता संबोधित करताना एमएसएमइ पल्स, एमएसएमइ चे आणि क्रिसायडेक्सचे हेल्थ ट्रॅकर, एमएसइ भावना व आकांक्षांचे मापन, इंडस्ट्री स्पॉटलाइट आणि उद्योगक्षेत्रांवर एक सर्वंकष अहवाल आणि फिंटेक पल्स, मायक्रोफायनान्स पल्स शिवाय फिंटेक लेंडिंग विभागावरील क्रेडीट डेटा अंतरदृष्टी अशा अनेक उपक्रमांचे नेतृत्व केले.

## सूक्ष्मवित्त क्षेत्रातील सिडबी

मायक्रोफायनान्स चळवळीला पाठींबा देत समावेशक वित्तविषयक कार्यावली पुढे नेण्यासाठी सिडबीने अग्रणी भूमिका बजावली आहे. बँकेच्या सूक्ष्मवित्त उपक्रमांतर्गत 31 मार्च 2022 पर्यंत वितरित केलेली एकत्रित मदत ₹23,460 करोड आहे, ज्याचा लाभ सुमारे 4.83 करोड घटकांना झाला. एमएफआयना वित्त पुरवठा आणि समन्यायी पाठबळ देण्यासह या संस्थांना क्षमता बांधणीचा आधार देऊन अनुपालन मूल्यांकनाच्या साधनांद्वारे कॉर्पोरेट संस्कृती आत्मसात करण्यात सिडबीची भूमिका अग्रणी राहीली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाच्या सुरवातीच्या नाजूक काळात हातात हात घेऊन तो पूर्णपणे विकसित उद्योग विभाग होण्यापर्यन्तचे पूरक समर्थन, आमच्या 8 भागीदार एमएफआयना एसएफबीज/ युनिव्हर्सल बँक्सचे संक्रमणात संचयन करणे. बाजारभावापेक्षा बऱ्यापैकी कमी व्याजदरात थेट सिडबी कडून (भागीदारी करारा द्वारे ) लघु कर्जांची उपलब्धता करण्याचा सूक्ष्म कर्ज पुरवठ्यातील पथदर्शी पुढाकार. 'प्रयास' या शीर्षकांतर्गत पिरॅमिडच्या पायथ्याशी असणाऱ्या सूक्ष्म ऋणकोंसाठी बाजारभावापेक्षा तुलनेने कमी व्याजदरात भागीदारी मॉडेल अंतर्गत ₹0.5 लाख ते ₹ 5 लाख पर्यन्तच्या लघु तिकीट आकाराच्या कर्जाचा विस्तार सिडबीबँक करत आहे.

## इक्विफॅक्स विषयी

Equifax (NYSE: EFX) येथे, आमचा विश्वास आहे की ज्ञानामुळे प्रगती होते. जागतिक डेटा, विश्लेषणे आणि तंत्रज्ञान कंपनी म्हणून, आम्ही वित्तीय संस्था,कंपन्या, कर्मचारी आणि सरकारी संस्थांना अधिक आत्मविश्वासाने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास मदत करून जागतिक अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावतो. आमचा विलक्षण डेटा, विश्लेषणे आणि क्लाउड तंत्रज्ञानाचे अनोखे मिश्रण लोकांना पुढे नेण्यासाठी सामर्थ्यपूर्ण निर्णयांची अंतर्दृष्टी देते. अटलांटा येथे मुख्यालयअसलेले आणि जगभरातील 11,000 हून अधिक कर्मचाऱ्यांनी समर्थित, Equifax उत्तर अमेरिका, मध्य आणि दक्षिण अमेरिका, युरोप आणि आशिया पॅसिफिक प्रदेशातील 25 देशांमध्ये कामकाज करते किंवा गुंतवणूक करते. अधिक माहितीसाठी, Equifax.com ला भेट द्या.

### अस्वीकरण

मायक्रोफायनान्स पल्स (अहवाल) इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (इक्विफॅक्स) द्वारा तयार करण्यात आले. या अहवालाच्या वापराद्वारे वापरकर्ता या अस्वीकाराणच्या आधीन राहून त्याची स्वीकृती देतो. इक्विफॅक्सचे जे सभासद आहेत त्या मायक्रोफायनान्स संस्थांच्या जून 2022 च्या पर्याप्त माहीती प्रदानावर आणि त्या माहीतीच्या सविस्तर तौलकनि प्रक्रियेवर आधारीत हा अहवाल आहे. इक्विफॅक्स अहवाल तयार करताना पुरेशी काळजी घेत असते. परंतु मायक्रोफायनान्स संस्थांनी सदर केलेल्या अयोग्य व चुकीच्या माहीतीमुळे अहवालात उद्‌भवत असलेल्या चुकांबाबत /त्रुटींबाबत इक्विफॅक्स उत्तरदायी असू शकत नाही. शिवाय, इक्विफॅक्स अहवालातील माहीतीच्या पूर्णतेची किंवा पर्याप्ततेची आणि/ किंवा कुठल्याही विशिष्ट उद्देशासाठी त्याच्या उपयुक्ततेची हमी देत नाही. किंवा, अहवालाच्या कुठल्याही उपयोगासाठी इक्विफॅक्स उत्तरदायी नाही आणि इक्विफॅक्स अशा सर्व उत्तरदाकयत्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करते. हा अहवाल कुठल्याही उपयोजन,उत्पादन/ परिणामाच्या नकार/ अस्वीकृती अथवा स्वीकृतीची अनुशंसा करत नाही किंवा इक्विफॅक्स i)कर्ज देणे वा न देणे ii) व्यक्ती संबंधित/ संस्था संबंधित कुठल्याही आर्थिक व्यवहारात उतरणे वा न उतरण्याची अनुशंसाही करत नाही. या अहवालातील माहीती कुठल्याही प्रकारचा सल्ला स्थापित करत नाही आणि या अहवालातील माहीतीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूवी वापरकर्त्याने त्याच्या मते योग्य असणारे सर्व आवश्यक विश्लेषण केले पाहीजे. या अहवालाचा वापर क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज (नियंत्रण) कायदा 2005, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रेग्युलेशन 2006, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रूल्स, 2006 मधील तरतुदी द्वारा नियंत्रित केला जातो. पूर्व परवानगी शिवाय या अहवालाच्या कुठल्याही भागाच्या प्रती तयार, वितरित वा प्रकाशित करू नये.

इंग्रजीतून मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता / तफावत आढळल्यास, इंग्रजीतील संबंधित मजकूर / संदर्भ ग्राह्य धरला जाईल

## संपर्क तपशील

**इक्विफॅक्स क्रेडिट इन्फॉर्मेशन सर्विसेस (प्रा) लिमिटेड**

यूनिट क्रमांक 931, 3रा मजला, बिल्डिंग/ इमारत सं 9,
सॉलीटेअर कार्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093.

**टोलफ्री क्र.: 1800 2093247**
ecissupport@equifax.com

**भारतीय लघु उद्योग विकास बँक**

स्वावलंबन भवन, प्लॉट क्र. सी -11, 'जी' ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई - 400 051 महाराष्ट्र

**टोलफ्री क्र: 1800 226753**
www.sidbi.in/en



Copyright © 2022, Equifax Inc., Atlanta, Georgia. All rights reserved. Equifax is a registered trademarks of Equifax Inc.